दैनिक बातम्यांचा राजा
जनप्रवास सांगली

■ मंगळवार दि. २० डिसेंबर २०२२
Website : janpravas.in



# शिवाजी विद्यापीठाची प्रिया पाटील महाराष्ट्र राज्य 'एनएसएस'ची सदिच्छा दूत

जनप्रवास । प्रतिनिधी

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक प्रिया पाटील हिची महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) सदिच्छा दूत पदावर नियुक्ती होणे, ही बाब विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानास्पद स्वरूपाची आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे काढले.



महाराष्ट्र राज्य एनएसएसच्या सदिच्छा दूतपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रिया पाटील हिचे पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन अभिनंदन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवर.

विद्यापीठाशी संलग्नित विवेकानंद महाविद्यालयात प्राणीशास्त्र विषयाची विद्यार्थिनी व एनएसएस स्वयंसेवक प्रिया पाटील हिची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी राज्य एनएसएसच्या सदिच्छा दूतपदी नियुक्ती करण्यात आल्याचा शासन निर्णय काल, दि. १६ डिसेंबर २०२२ रोजी निर्गमित झाला. त्यानंतर आज प्रिया पाटील हिने कुलगुरू डॉ. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोविडच्या कालखंडात प्रिया हिने कोविडग्रस्त नागरिकांच्या मृतदेहांचे शववाहिकेतून वहन व अंत्यसंस्कार करून ज्या पद्धतीने सामाजिक सेवेचे व्रत निभावले, ते आसाधारण स्वरूपाचे आहे. आई-वडिलांचे समर्थ पाठबळ आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे संस्कार या बळावरच ती हे काम करू शकली. एनएसएसच्या स्वयंसेवकांसाठी तिचे कार्य प्रेरणादायी आहे. आता राज्याची सदिच्छा दूत बनल्यानंतर तिच्या माध्यमातून या सेवाभावाचा प्रसार युवा पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात होईल. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाचा लौकिकही वृद्धिंगत होईल.

यानिमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याहस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन प्रिया पाटीलचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, डॉ. एच. पी. पाटील आणि डॉ. आर. जी. कोरबू उपस्थित होते.

दरम्यान, दि. १६ डिसेंबर २०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार, प्रिया पाटील यांची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विना-मानधन तत्त्वावर एनएसएस सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तिने केलेले कार्य युवकांना प्रेरणादायी ठरण्यासाठी ही नियुक्ती आहे.

याअंतर्गत प्रिया पाटील हिची व्याख्याने आयोजित करणे, विद्यार्थी व युवकांशी संवादाचे कार्यक्रम आयोजित करणे आणि त्या कार्यक्रमामध्ये शासनाच्या विविध योजना तसेच राष्ट्रीय सेवा योजनेने हाती घेतलेले उपक्रम व उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रिया पाटील सहकार्य करतील. आयोजक विद्यापीठ/ संचालनालय यांनी अधिनस्थ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी संवादाची, प्रचार व प्रसाराची आणि प्रत्यक्ष सामाजिक सुधार उपक्रम आयोजित करण्याची जबाबदारी कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, एनएसएस यांची असेल. कार्यक्रमाचे नियोजन व आखणी करण्याची जबाबदारी कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, एनएसएस यांची राहील. राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, एनएसएस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष हे नियंत्रक म्हणून काम पाहतील, असेही यात म्हटले आहे.

लोकमत
रविवार १८.१२.२०२२

# प्रिया पाटील राज्याची सदिच्छा दूत

## कोरोनाकाळातील कामाची दखल : पाचशेवर मृतदेहांवर केले अंत्यसंस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाकाळात शववाहिकेवर चालक म्हणून काम केलेल्या प्रिया पाटीलची राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने राबविल्या जाणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमात युवकांचा सहभाग व योजनांच्या प्रचार-प्रसारासाठी सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती झाली आहे. कोरोना काळात केलेल्या कामाची शासनाने एवढी दखल घेऊन माझी नियुक्ती केली याचे समाधान आहे. यापुढेही मी सामाजिक कार्य करत राहीन, अशी प्रतिक्रिया प्रियाने 'लोकमत'ला दिली.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, त्यांच्याशी संवाद अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमार्फत शासनाच्या विविध योजना, उपक्रम, उद्दिष्ट्ये साध्य करण्याचे काम सदिच्छा दूत म्हणून प्रिया पाटील करणार आहे. ती विवेकानंद महाविद्यालयात बी. एस्सी.च्या शेवटच्या वर्षात शिकत असून भवानी फाउंडेशनच्या माध्यमातून कोरोना काळात सुरू असलेल्या शववाहिकेवर चालक म्हणून तिने काम केले.

याकाळात हर्षल सुर्वे व सहकाऱ्यांच्या मदतीने पाचशेहून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या कामासाठी तिला वडील प्रकाश पाटील व आई मनीषा पाटील यांचे पाठबळ लाभले. तिच्या या कामाचे कौतुक झाले होते.



### गरज पडेल तेव्हा मदत

प्रियाला सामाजिक कार्याची आवड असून यापुढेही ती हे काम करत राहणार आहे. शासनाच्या विविध योजनांसाठी गरज पडेल, त्यावेळी मदत करेन, असा मनोदय तिने व्यक्त केला.

epaper.lokmat.com | लोकमत | कोल्हापूर, शुक्रवार, दि. ४ मार्च २०२२

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या दीक्षांत समारंभ

## कोल्हापूरच्या ऐश्वर्या मोरेला राष्ट्रपती सुवर्णपदक; स्वाती पाटील कुलपती सुवर्णपदकाची मानकरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ उद्या, शनिवारी सकाळी अकरा वाजता ऑनलाईन स्वरूपात होणार आहे.

सन २०२०-२१ वर्षात क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्र, एनसीसी, एनएसएसमध्ये आदर्श ठरल्याबद्दल विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (रा. वडरगे, ता. गडहिंग्लज) राष्ट्रपती सुवर्णपदकाची, तर एम. ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (रा. दानोळी, ता. शिरोळ) ही कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात ऑनलाईन दीक्षांत समांरभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नोलॉजीचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे प्रमुख पाहुणे व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत उपस्थित असणार आहेत. पत्रकार परिषदेत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### महाविद्यालयीन स्तरावर पदवी प्रदान समारंभ नाही

महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नसून याच सोहळ्याच्या माध्यमातून स्नातकांना पोस्टाद्वारे प्रमाणपत्रांचे वितरण करणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.



विवेकानंद महाविद्यालयातून बी. एस्सी. पूर्ण केले. वडील सैन्यदलातील सुभेदार (निवृत्त) असून आई सविता गृहिणी आहे. एनएसएस, एनसीसीमध्ये भाग घेतला. कोल्हापूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या स्वच्छता उपक्रमात ७४ रविवारी योगदान दिले आहे. प्रशासकीय अधिकारी व्हायचे आहे.

**- ऐश्वर्या मोरे,**
राष्ट्रपती सुवर्णपदकाच्या मानकरी



राजाराम महाविद्यालयातून बी. ए.ची पदवी घेतली. वडील शेतकरी आणि आई संजीवनी गृहिणी आहेत. पदव्युत्तर शिक्षणानंतर शिक्षण क्षेत्रामध्ये करिअर करणार आहे. कुलपती सुवर्णपदकापर्यंतच्या माझ्या प्रवासात आई-वडील आणि शिक्षकांचे योगदान मोलाचे आहे.

**- स्वाती पाटील,**
कुलपती सुवर्णपदकाच्या मानकरी



### आकडेवारी दृष्टिक्षेपात

विद्याशाखानिहाय पदवीधर
विज्ञान व तंत्रज्ञान : २६८१४
वाणिज्य व व्यवस्थापन : १९७२०
मानव्यविद्या : १४०६४
आंतरविद्याशाखीय : १७६२
पीएच. डी. : १८८
विविध पारितोषिक : २१७
पदवी घेणारे परदेशी विद्यार्थी : १९
पीएच.डी. घेणारे परदेशी विद्यार्थी : २

### पेपरलेस 'दीक्षांत'

यावर्षी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज, शुल्क घेण्याची सर्व प्रक्रिया ऑनलाईन केली असून दीक्षांत समारंभ पेपरलेस झाला आहे. गेल्यावर्षी ९० टक्के पदवी प्रमाणपत्रांचे वितरण दोन महिन्यांत केले होते, असे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

### पदवीधर होण्यात पहिल्यांदाच मुलींची आघाडी

- शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात यंदा पहिल्यांदाच पदवीधर होण्यात मुलींनी आघाडी घेतली आहे.
- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण ३२५२० मुली, तर २९८४० मुले पदवी घेणार आहेत. यावर्षी ६२३६० स्नातकांना पदवी दिली जाणार आहे. त्यात ५२ टक्के मुली आहेत.
- शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात मुलींची संख्या १९९ इतकी होती. पालकांच्या सकारात्मक भूमिकेमुळे वर्षागणिक ती वाढत गेली. उच्च शिक्षणातील मुलींचे वाढत्या प्रमाणाचे हे चांगले चित्र असल्याचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**या वर्षातील पदवीधरांची संख्या**

| अभ्यासक्रम | मुली | मुले |
|---|---|---|
| एम. एस्सी. | १७७० | ७५१ |
| बी. कॉम. | ७८३३ | ५४०० |
| बी. एस्सी. | ७०३१ | ६७७२ |
| एम. कॉम. | ११८४ | ५५६ |
| बी. एड. | ६९७ | २०२ |
| एम. ए. | ६६३ | २७७ |



**वर्ष व वाढलेले मुलींचे प्रमाण**

१९६४ : १९९
१९७४ : १६६३
१९८४ : ३२६८
१९९४ : ७८१७
२०१८ : २६९३८
२०२२ : ३२५२०

### निमंत्रितांनी ऑनलाईन सहभागी व्हावे

दीक्षान्त समारंभात प्रत्यक्ष कोणतेही पारितोषिक, पदवी प्रदान करण्यात येणार नाही. निमंत्रितांनीही 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरच ऑनलाईन उपस्थित राहून कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरु डॉ. शिर्के यांनी केले.

लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, सोमवार, दि. २६ सप्टेंबर २०२२



# माणसांना जवळ आणण्याचे काम 'एनएसएस'ला करावे लागणार

## अभय जायभाये : विवेकानंद कॉलेजमध्ये वर्धापन दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेमधून (एनएसएस) विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, समता, स्वावलंबन, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व ही सर्व मूल्ये आत्मसात करता येतात. बदलत्या काळात माणसांना जवळ आणण्याचे काम 'एनएसएस'च्या स्वयंसेवकांना करावे लागणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे एनएसएसचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी शनिवारी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस वर्धापन दिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव होते.

समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून एनएसएसचे व्यासपीठ काम करीत असते. समाजातील प्रत्येक चांगल्या घडामोडीत एनएसएसचा सहभाग हा असतो. सामाजिक जबाबदारीची भावना वाढीस लागते त्यामुळे महाविद्यालयाच्या विकासात एनएसएस विभाग महत्त्वपूर्ण असतो, असे डॉ. पांडव यांनी सांगितले.



कोल्हापुरात शनिवारी विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. अभय जायभाये यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी प्रा. संदीप पाटील उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रिया पाटील, इंद्रजा गोरे, कल्याणी पाटील, स्वयंम सावंत, संदीप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. बी. के. गावित, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी, आदी उपस्थित होते. प्रा. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिली. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जी.एस. उबाळे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
▮ बुधवार, २२ जून २०२२

# भारतीय संस्कृती योगसाधनेने सिद्ध : प्राचार्य साळुंखे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संस्कृती आणि लोकजीवन योगसाधना यांनी समृद्ध बनली आहे. भारतीय संस्कृतीमधील विविधतेतील अखंडता साधुसंतांची योगसाधना आणि तपश्चर्येमुळेच शक्य झाली, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी आणि एनएसएस यांच्यातर्फे आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय योग दिन उद्घाटन समारंभप्रसंगी केले. अध्यक्षस्थानी चेअरमन प्रा. किरण पाटील होते.

यावेळी योगशिक्षिका गीता लिंग्रस, दीपा पाटील यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. स्वागत लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. आभार कॅप्टन सुनीता भोसले यांनी मानले. सूत्रसंचालन अवंतिका कुबेर यांनी केले. संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, ५ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मंजुनाथ हेगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रा. पी. आर. बागडी, प्रा. राजश्री पाटील, प्रा. वर्षा पवार, प्रा. बी. के. गावित, प्रा. सुप्रिया पाटील, एनएसएस आणि एनसीसी छात्र उपस्थित होते.

पुढारी कोल्हापूर, शुक्रवार, ४ मार्च २०२२

# ऐश्वर्या मोरे राष्ट्रपती, स्वाती पाटील कुलपती सुवर्णपदकाची मानकरी



राष्ट्रपती सुवर्णपदक हे प्रामाणिक कष्टाचे फळ आहे. या पुरस्काराने जबाबदारी वाढली आहे. आगामी काळात समाजातील तळागाळातील लोकांची सेवा करायची आहे. यातून विद्यापीठाचा नावलौकिक वाढेल, असा प्रयत्न राहील.

- ऐश्वर्या मोरे

पुढारी

सोमवार, ४ एप्रिल २०२२

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात डॉ. एस. एन. पाटील फौडेशन, तुरुकवाडी (ता. शाहूवाडी) यांच्या वतीने ग्रामस्थ व स्वयंसेवकांच्या आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन डॉ. एस. एन. पाटील यांच्या हस्ते झाले. प्रत्येकाने किमान दररोज ४५ मिनिटे चालणे गरजेचे आहे. त्यात सातत्य ठेवावे, असा सल्ला दिला. डॉ. पंकज पाटील यानी आहार व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. प्रज्ञा पाटील यांनी महिलांचे आरोग्य विषयावर मार्गदर्शन केले. मारुती पाटील यांनी रक्तगट तपासणी केली.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. राजश्री पाटील, डॉ. प्रभा पाटील, प्रा. नम्रता ढाळे, प्रा. डॉ. वाय. डी. हरताळे, एस. पी. देसाई, श्रीराम बोंगे, ई. जी. मंगल उपस्थित होते.

# एनएसएसमुळे संवेदनशील विद्यार्थी घडतात : प्रा. जायभावे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाबरोबरच कष्ट करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात एनएसएसचा मोठा वाटा असतो. बदलत्या काळात माणसाला जवळ आणण्याचे काम एनएसएसच्या स्वयंसेवकांना करावे लागणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये एन.एस. एस. वर्धापनदिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यशैली विद्यार्थ्यांना बहुआयामी बनवत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाला समृद्ध बनवावे. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रिया पाटील, इंद्रजा गोरे, कल्याणी पाटील, स्वयंम सावंत, संदीप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिली. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी ज्युनिअर विभागाचे एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. के. गावित, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी आदी उपस्थित होते.

P.J. 26/9/2022

PE 27.9.22

पुढारी
बुधवार, २२ जून २०२२

# आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय योग दिन कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. शासकीय कार्यालये तसेच शाळा, महाविद्यालयांत योग दिनानिमित्त विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

शहरातील शासकीय कार्यालये तसेच विविध सामाजिक संघटनांनीही योग दिनाचे औचित्य साधून योग विषयक व्याख्यानांचे आयोजन केले होते.

उभ्या, बैठ्या आणि निद्रा स्थितीतील ताडासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोनासन, भद्रासन, शशांकासन, वक्रासन, भुजंगासन, शलभासन, मक्रासन, सेतुबंधासन, शवासन, कपालभाती, अनुलोम-विलोम, भ्रामरी, ध्यान आदी प्रकारची योगासने करण्यात आली.

अखिल भारतीय क्रीडा भारती कोल्हापूरच्या वतीने ध्यान धारणा करण्यात आली. महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये एनसीसी कॅडेटस्नी योगाची माहिती दिली. यावेळी कमांडिंग ऑफिसर कर्नल मुथान्ना करीअप्पा, संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील, मुख्याध्यापक एस. एस. पाटील, एस. एस. मोरे, यू. आर. आतकिरे आदी उपस्थित होते.


पंचगंगा नदी घाट कोल्हापूर येथे योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी उत्तरेश्वर पेठ पंचगंगा नदी घाट येथे भरत काळे भाजप मंडल अध्यक्ष नरेंद्र जाधव, संदीप कुंभार, भाजप प्रदेश उपाध्यक्ष संदीप देसाई, रमेश दिवेकर कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

**विकास विद्यामंदिर**


दुधाळी परिसरातील विकास विद्यामंदिरमध्ये जागतिक योग दिवस साजरा झाला. अवनि संस्थेच्या सहायक अधीक्षक पूजा कांबळे यांनी मुलांकडून योगाची प्रात्यक्षिके करवून घेतली. सांस्कृतिक विभागाचे राजेंद्र जाधव व अस्लम शिकलगार यांनी योगासनांचे महत्त्व विशद केले. यावेळी क्रीडा शिक्षक कालिदास कोळी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**विधी सेवा प्राधिकरण**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. एफ. सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योग दिवस साजरा झाला. सकाळी ७ ते ८ या वेळेत जिल्हा न्यायालयातील न्यायिक अधिकारी, विधिज्ञ, कर्मचारी, विधी स्वयंसेवक यांनी प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग नोंदवला. योगगुरू संभाजी काकडे, ॲड. डी. जे. पाटील, शीतल काजवे, आशा जाधव यांनी योगाची प्रात्यक्षिके व महत्त्व सांगितले. यावेळी



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातर्फे योग दिन साजरा करण्यात आला.



महावीर महाविद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगाची प्रात्यक्षिके सादर करताना विद्यार्थी. (छाया : पप्पू अत्तार)

**महावीर महाविद्यालय**

महावीर महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने योगा दिन साजरा झाला. विद्यार्थ्यांनी योगा प्रात्यक्षिक केले. सशक्त देशासाठी सशक्त युवक बनावे त्यासाठी योगाच्या माध्यमातून मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती मिळते, असे प्रतिपादन लेफ्टनंट कर्नल एम. मुठणा यांनी केले. उपक्रमात महावीर महाविद्यालय, एस. एम. लोहिया हायस्कूल, न्यू हायस्कूल व कोल्हापूर हायस्कूलमधील एन. सी. सी. छात्र सैनिक उपस्थित होते. लेफ्टनंट उमेश वांगदरे, लेफ्टनंट डॉ. सुजाता पाटील, सेकंड ऑफिसर अमोल जाधव, प्रीती मुरगुंडे, सुभेदार मेजर महेश जाधव यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

**विवेकानंद कॉलेज**

भारतीय संस्कृती आणि लोकजीवन योग साधना यांनी समृद्ध बनली आहे. भारतीय संस्कृतीमधील विविधतेतील अखंडता साधुसंतांच्या योग साधना आणि तपश्चर्येमुळेच शक्य झाली आहे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद महाविद्यालयातील एन. सी. सी. आणि एन. एस. एस. यांच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते. योग शिक्षिका गीता लिंग्रस व दीपा पाटील यांनी प्रात्यक्षिक प्राणायाम, ध्यानधारणा याद्वारे शारीरिक मानसिक व बौद्धिक संतुलनासाठीचे प्रशिक्षण दिले. प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. कॅप्टन सुनीता भोसले यांनी आभार मानले.

**कॉमर्स कॉलेज**

यावेळी डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्राचार्य डॉ. आर. नारायण, प्रभारी प्राचार्य एस. जे. फराकटे सहभागी झाले होते. डॉ. मगदूम यांनी तणावमुक्त जीवनासाठी योगा आवश्यक असल्याचे सांगत निरोगी, आरोग्यमय जीवन कसे जगावे याबाबत मार्गदर्शन केले.

**कमला कॉलेज**

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये जागतिक योग दिन साजरा झाला. धावपळीच्या युगात योगाचे महत्त्व व शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी योगाची आवश्यकता याची माहिती प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी दिली. योगा विभागाच्या विद्यार्थिनींनी योगावर आधारित पोस्टरद्वारे प्रबोधन केले. डॉ. सुनीता काळे यांनी प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, डॉ. अनिल घस्ते, सुजय पाटील उपस्थित होते.

**शाहू कॉलेज**

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये योग दिनानिमित्त 'आरोग्यदायी जीवनासाठी योग' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. सविता माजगावकर, प्रा. गणेश लवंगारे, ऋचा सुंदराणी, दिव्या जोथानी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. किल्लेदार, उपप्राचार्य डॉ. के. व्ही. गायकवाड, डॉ. एस. पी. पवार उपस्थित होते.

**राजाराम महाविद्यालय**

राजाराम महाविद्यालय येथे एनसीसी छात्रांनी योगाची प्रात्यक्षिके सादर केली. महाराणी ताराराणी चौकात योगासनाबाबत माहिती दिली.

पुढारी ११

कोल्हापूर, शुक्रवार, २ डिसेंबर २०२२

# विवेकानंद कॉलेजमध्ये जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या मैदानावर एड्स जनजागृती कार्यक्रमांतर्गत एड्स निर्मूलन माहिती, पोस्टर प्रदर्शन व शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंचगंगा हॉस्पिटल येथील समुपदेशन अधिकारी सुरेखा जाधव, जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी दीपा शिपूरकर, लॅब टेक्निशियन मीनल पाटील यांनी उपस्थितांना शपथ दिली. कॉलेजच्या एन.सी.सी. व एन.एस.एस. मधील विद्यार्थ्यांनी सीपीआर हॉस्पिटलतर्फे आयोजित एड्स जनजागृती रॅलीत सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन सुनीता भोसले यांनी नियोजन केले.

सकाळ

कोल्हापूर, बुधवार,
२० एप्रिल २०२२

# 'विवेकानंद'चे विद्यार्थी सहभागी होणार



पंचगंगा नदी ही केवळ एका जिल्ह्यापुरती मर्यादित नाही, तर सांगली जिल्ह्यालाही नदीचा लाभ झाला आहे. त्यामुळे नदी प्रदूषणमुक्त रहावी, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. या दृष्टिकोनातून 'सकाळ'ने घेतलेला उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, त्यात विवेकानंद महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

**– प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार**

(स्वामी विवेकानंद महाविद्यालय)

सकाळ

कोल्हापूर, रविवार,
१८ डिसेंबर २०२२

१

# ‘विवेकानंद’ची प्रिया पाटील ‘एनसीसी’ची सदिच्छादूत

कोल्हापूर, ता. १७ : राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांत युवकांना सहभागी करण्यासाठी, शासनाच्या योजनांचा प्रचार व प्रसारासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रिया पाटीलची सदिच्छादूत म्हणून निवड झाली. २०२२-२३ साठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राष्ट्रीय सेवा योजना राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांनी निवड केली. प्रिया सध्या विज्ञान शाखेत पहिल्या वर्षात शिकत असून, कोरोना काळात तिने तीनशेहून अधिक मृतदेहावर अत्यंसंस्कार केले. प्रियाने आज शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते तिचा सत्कार झाला. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, योजनेचे संचालक अभय जायभाये, विवेकानंदचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, डॉ. एच. पी. पाटील, डॉ. आर. जी. कोरबू उपस्थित होते.



प्रिया पाटील.

सकाळ
शुक्रवार, ९ सप्टेंबर २०२२ ४

# 'एनएसएस'मुळे तरुणाईत सामाजिक जाणीव : डी. आर. मोरे

## विवेकानंद महाविद्यालयात 'एनएसएस'चे उद्‌घाटन

**कोल्हापूर, ता ८ :** राष्ट्रीय सेवा योजनेमुळे (एनएसएस) तरुण-तरुणींत स्वयंशिस्त, स्वावलंबन हे गुण विकसित होतात, त्यांना श्रमाचे महत्त्व कळते, सामाजिक जाणीव निर्माण होते. राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी एनएसएसचे उपक्रम उपयोगी ठरतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या 'बीसीयूडी' संचालक प्राचार्य डॉ.डी. आर.मोरे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात एनएसएस योजनेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.आर. आर.कुंभार होते.

डॉ.मोरे म्हणाले, की शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा पश्चिम महाराष्ट्रात पोहचवली व खेड्यांकडे चला हा महात्मा गांधींचा संदेश पोहचविण्यासाठी 'एनएसएस''च्या विद्यार्थ्यांचा सहभाग मोलाचा आहे. 'एनएसएस'च्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवून आधुनिक काळात सुसंस्कारीत पिढी घडविण्याचे मोलाचे काम होत आहे. श्रमाची प्रतिष्ठा जपल्यामुळे स्वयंम शिस्त, स्वावलंब आमुळे बलवान राष्ट्राची निर्मिती युवा शक्तीद्वारे केली जाते. डॉ.कुंभार म्हणाले 'मन, मनगट, मेंदू एकत्र आले की कोणतेही काम उत्कृष्ट होते. त्याचबरोबर महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी महापूर व कोरोना या काळात केलेल्या कार्याचा गौरव केला.

ओम पाटील, साक्षी दुबे, आशिष जाधव, स्वरुपा वडाम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल विचार व्यक्त केले. प्रा.संदीप पाटील यांनी स्वागत केले, प्रा. पी. आर. बागडे यांनी परिचय करुन दिला. प्रा.सरीता शिंदे यांनी आभार मानले. प्रा.राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.श्रुती जोशी, डॉ.जी.एस.उबाळे, डॉ.प्रभा पाटील, डॉ.ए.एस.महात, डॉ.कैलास पाटील, प्रा.एच.व्ही.चामे, प्रा. संपदा ढाले, प्रा.तिजाईकर आदी उपस्थित होते.

सकाळ

दि० 23.04.2022

## विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद महाविद्यालयाचे एनसीसी छात्र गणवेशात सहभागी झाले होते. त्यांनी नदी घाटाची स्वच्छता केली. त्यांच्याबरोबर प्राचार्य आर. आर. कुंभार, कॅप्टन सुनील भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, अभिषेक हावळ उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. एच. पी. पाटील, डॉ. प्रा. पी. आर. बागडे, राजश्री पाटील, संदीप पाटील उपस्थित होते.

सकाळ

रविवार,
२४ एप्रिल २०२२

# निर्धार पंचगंगा प्रदूषणमुक्तीचा!

'पुन्हा साथ देऊया, चला पंचगंगा वाचवूया' मोहिमेत शुक्रवारी विविध संस्था, संघटना सहभागी झाल्या. पंचगंगेसाठी सातत्याने स्वच्छता मोहिमेत सहभागी होतानाच कमीत कमी पाण्याचा वापर आणि प्रबोधनाबरोबरच सर्व कृती कार्यक्रमांत सहभागी होण्याची ग्वाही यानिमित्ताने त्यांनी दिली.



पंचगंगा वाचवूया मोहिमेत सहभागी झालेले विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी व छात्रसैनिक.

तरुण भारत
रविवार १८ डिसेंबर २०२२

# कोरोनायोद्धा प्रिया पाटील महाराष्ट्राची ब्रँड ॲम्बेसिडर

## राष्ट्रीय सेवा योजनेची सदिच्छादूत म्हणून नियुक्ती : कोल्हापूरच्या सुकन्येच्या कार्याला राजमान्यता

संजीव खाडे
कोल्हापूर

कोरोना संकटकाळात शववाहिकेचा चालक बनून पाचशेहून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणारी कोल्हापूरची कोरोनायोद्धा प्रिया पाटील हिची महाराष्ट्राची ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) सदिच्छादूताची जबाबदारी प्रिया हिच्यावर सोपविली आहे. या संदर्भातील शासकीय आदेश काढला आहे. या निवडीने प्रियाच्या संवेदनशील सामाजिक कार्याला राजमान्यता लाभली आहे.

कोरोना लाटेत मृत्यू झालेल्या व्यक्तींवरील अंत्यसंस्काराचा प्रश्न पुढे आला होता. या




तरुण भारत
विशेष वृत्त

अत्यंत संवेदनशील कार्यात महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांबरोबर शासकीय आरोग्य विभाग, शववाहिकेवरील कर्मचारी, स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालत कोरोनाने मृत्यू झालेल्या व्यक्तीला शेवटचा निरोप दिला. काही सामाजिक संघटना, कार्यकर्त्यांचाही समावेश होता. हर्षल सुर्वे, संभाजी उर्फ बंडा साळोखे या कार्यकर्त्यांनी कोरोनाने मृत झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना शववाहिकेसह स्वतः योगदान दिले. बैतुलमालच्या जाफरबाबा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनीही कोरोनाने मरण पावलेल्यांवर अंत्यसंस्कार केले.

कोरोनाच्या लाटेत कोरोना योद्धे लढत असताना त्यांच्या कार्यात प्रिया पाटील सहभागी झाली. विवेकानंद कॉलेजमध्ये बी. एस्सी.च्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या प्रियाने समाजाप्रती असलेल्या कर्तव्याच्या भावनेतून शववाहिकेची चालक म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली. शिवसेना शहर समन्वयक हर्षल सुर्वे यांच्याकडे तिने कार्याची इच्छा व्यक्त केली.

पान ९ पहा

> कोरोना संकटकाळात प्रिया पाटीलने मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले. तिच्या या सामाजिक कार्याची दखल शासनाने घेतली आहे. तिची समाजाप्रती असलेली कर्तव्याची भावना आणि तिचे कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी ठरु शकेल.
> **-चंद्रकांतदादा पाटील,** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

> कोरोना संकटकाळातील परिस्थिती पाहिल्यानंतर सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कार्य करण्याचे ठरविले. हर्षल सुर्वेनी प्रोत्साहन दिले. आई मनिषा, वडील प्रकाश पाटील यांनी पाठबळ दिले. त्यामुळे कर्तव्य बजावता आले.
> **-प्रिया पाटील, सदिच्छादूत**

# कोरोनायोद्धा प्रिया पाटील महाराष्ट्राची ब्रँड ॲम्बेसिडर

**पान १ वरुन**

सुर्वे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रियाच्या धाडसाचे कौतुक करत तिला प्रोत्साहन आणि पाठबळ दिले. प्रियाने सहकाऱ्यांच्या मदतीने तब्बल पाचशेहून अधिक कोरोनाने मृत्यू झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार केले. यावेळी शववाहिकेतून मृत व्यक्तीचा देह स्मशानभूमीकडे नेणे, तेथील कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने अंत्यसंस्कार करण्याचे पुण्य प्रियाने मिळवले. तिच्या कार्याचा कोल्हापूरकरांनी गौरवही केला होता.

**राजमान्यता, सदिच्छा दूत म्हणून निवड**

प्रियाच्या कार्याची दखल घेत राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तिची राष्ट्रीय सेवा योजना अर्थात एनएसएसची सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती केली आहे. या संदर्भातील आदेशही काढण्यात आला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने आयोजित करणे, विद्यार्थी व युवकांशी संवाद साधणे इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम, उद्दिष्टे साध्य करण्याचे काम सदिच्छादूत म्हणून प्रिया पाटील करणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या काळासाठी ही नियुक्ती आहे.

प्रियाच्या नियुक्तीचे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राष्ट्रीय सेवा योजना राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे यांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान, हर्षल सुर्वे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कोरोनाच्या काळात कुणी पालक आपल्या मुला, मुलींना बाहेर सोडत नव्हते. अशा काळात प्रियाच्या आई, वडिलांनी तिला परवानगी दिली. प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी आल्यानंतर ती काहीशी घाबरली. पण आम्ही सर्वांनी पाठबळ दिल्यानंतर तिने धाडसाने कार्य सुरू केले. तिची निवड ही पुण्याईचे फलित आहे.

19/12/2022
19.12.22

तरुण भारत
सोमवार, २८ मार्च २०२२

# कणेरीवाडी पाझर तलाव बंधाऱ्याची स्वच्छता

## विवेकानंद कॉलेज, ग्रामस्थांचा सहभाग : पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष



कणेरीवाडी : पाझर तलावाच्या बंधाऱ्याची स्च्छता करताना ग्रामस्थ आणि विवेकानंदचे विद्यार्थी.

वार्ताहर
गोकुळ शिरगाव

कणेरीवाडी (ता. करवीर) येथील पाझर तलावाच्या बंधाऱ्याची विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी व ग्रामस्थ यांच्याकडून स्वच्छता करण्यात आली.

तलावाच्या बंधाऱ्यावर अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे उगवली आहेत. या झाडांच्या मुळे बंधाऱ्याला मोठ्या भेगा पडत चालल्या आहेत शिवाय बंधाऱ्यावर लावलेली दगड यांच्यामध्ये अंतर पडत चालले आहे. याचा धोका ओळखून कणेरीवाडी येथील नागरिकांनी कित्येक वेळेला या बंधाऱ्यावरील स्वच्छतेबाबत पाटबंधारे विभागाला पत्र दिल्याचे शिवसेना करवीर तालुका प्रमुख विनोद खोत यांनी यावेळी सांगितले. मात्र या विभागाने याकडे फारसे लक्ष दिले नाही या मुदतीतच कणेरीवाडी गावामध्ये विवेकानंद कॉलेज चे शिबिर भरले होते. यानिमित्ताने विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित कॅम्पमध्ये कणेरीवाडी तलाव परिसरात वाढलेली झाडे झुडपे काढण्यात आली व तलावाची बंधारा पाळी स्वच्छ करण्यात आली.

पाटबंधारे विभागातील अधिकारी वर्ग यांना वारंवार तक्रार व निवेदन देऊन तलाव परिसरात वाढलेली झाडे झुडपे वेळीच काढून घ्यावीत म्हणून कित्येक वेळा आवाज उठवण्यात आला परंतु पाटबंधारे विभागाने त्या कामाकडे दुर्लक्ष केले होते.

म्हणूनच कणेरीवाडीतील जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शशिकांत खोत, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश खोत, उपसरपंच अजित मोरे, पांडुरंग खोत, हिंदुराव कदम, केरबा मोरे, सामाजिक कार्यकर्ते सरदार मोरे, दशरथ खोत सुरज पाटील (वायरमन) अनिल शेळके, रोहित शेळके यांच्यासह कणेरीवाडी गावातील प्रमुख कार्यकर्ते व विवेकानंद कॉलेज मधील प्रमुख विद्यार्थी–विद्यार्थिनी शिक्षक यांनी हे काम हाती घेऊ या तलावातील बंधाऱ्यावरील पूर्ण झाडे–झुडपे काढून स्वच्छता केली. याबद्दल या विद्यार्थ्यांचे कणेरीवाडी गावामध्ये कौतुक होत आहे.

तरुण भारत
गुरुवार, ५ मे २०२२



कोल्हापूर : ऐश्वर्या मोरे हिचा सत्कार करताना प्रा. डॉ. आर. आर. कुंभार. सोबत डॉ. पाटील, डॉ. श्रुती जोशी, प्रा. पाटील, आकाराम मोरे.

# 'विवेकानंद'च्या ऐश्वर्या मोरेला राज्य शासनाचा पुरस्कार

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच मुंबई येथे पार पडला. विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका ऐश्वर्या मोरे यांना सन २०१९-२० सालातील उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते देवून सन्मानित केले. या यशाबद्दल विवेकानंद कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, ऐश्वर्याने राष्ट्रीय सेवा योजनेत राज्यस्तरापर्यंत आपल्या कार्याचा ठसा उमटविल्याबद्दल गौरव करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. पी. पाटील, डॉ. श्रुती जोशी, प्रा. संदीप पाटील, आकाराम मोरे आदी उपस्थित होते.

05/05/22

5/5/2022

प्रतिनिधी


कोल्हापूर

### शिवाजी विद्यापीठात योग प्रात्यक्षिके

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला. योग प्रशिक्षक सूरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रात्यक्षिके सादर केली. योगा प्रात्यक्षिकात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड सहभागी झाले होते.

### विवेकानंद कॉलेजमध्ये व्याख्यान अन् प्रात्यक्षिके

भारतीय संस्कृतीमधील विविधतेतील अखंडता साधुसंतांच्या योग साधना आणि तपश्चर्येमुळेच शक्य झाली आहे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयातील



**कोल्हापूर : शहाजी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आंतररा**

एन.सी.सी. आणि एन.एस.एस.च्यावतीने योग शिक्षिका गीता लिंग्रस, दीपा पाटील यांनी प्रात्यक्षिके सादर करत योगासने प्राणायाम, ध्यानधारणेचे प्रशिक्षण दिले. यावेळी जिमखाना चेअरमन प्रा. किरण पाटील, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, कॅप्टन सुनिता भोसले, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, ५ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मंजुनाथ हेगडे, प्रा. पी. आर. बागडी, प्रा. राजश्री पाटील, प्रा. वर्षा पवार, प्रा. बी. के गावीत, एनएसएस आणि एनसीसी छात्र उपस्थित होते.

### महापालिकेच्यावतीने योग शिबिराचे उद्घाटन

महापालिकेच्या केएमसी कॉलेजमध्ये योग शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ.